# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ४०(२)(घ)(एक) [40(2)(d)(i)] नुसार या निवडणूक सूचनेस जोडलेल्या परिशिष्ट-१ मध्ये नमूद केलेल्या प्रत्येक अभ्यास मंडळातील सदस्यांमधून एका सदस्याची अभ्यास मंडळाच्या अध्यक्ष पदाची निवडणूक**

## निवडणूक सूचना

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ४०(२)(घ)(एक) [40(2)(d)(i)] नुसार * (म.सा.वि.अ., २०१६, कलम ६५ मधील तरतुदींच्या अधीन राहून) या निवडणूक सूचनेस जोडलेल्या परिशिष्ट-१ मध्ये नमूद केलेल्या प्रत्येक अभ्यास मंडळाच्या पहिल्या बैठकीमध्ये संबंधित अभ्यास मंडळाच्या सदस्यांमधून एका सदस्याची अध्यक्ष म्हणून निवड करावयाची आहे. शुक्रवार, दि. १० ऑगस्ट, २०१८ रोजी आयोजित केलेल्या अभ्यास मंडळाच्या बैठकीत होणा-या अध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी दिनांक १७ मे, २०१७ रोजी महाराष्ट्र शासनाने राजपत्राद्वारे प्रसिध्द केलेला सन २०१७ चा एकरुप परिनियम क्रमांक ०१ मधील मुद्दा क्रमांक ०९ (२) नुसार ही निवडणूक सूचना देण्यात येत आहे.**

१) **परिशिष्ट-१ मध्ये नमूद केलेल्या आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेमध्ये समाविष्ट असलेल्या अभ्यास मंडळाकरिता, अभ्यास मंडळाच्या बैठकीतील निवडणूक कार्यक्रम खालीलप्रमाणे :**

| अ.क्र. | तपशील | वार, तारीख व वेळ | स्थळ |
|---|---|---|---|
| १ | उमेदवारी अर्ज सादर करण्याचा अंतिम वार, दिनांक व वेळ (सन २०१७ चा एकरुप परिनियम क्रमांक १(१०)(२)(क) नूसार निवडणुकीच्या दिनांकाच्या पूर्ण १० दिवस अगोदर) | सोमवार, दि. ३० जुलै, २०१८ (वेळ : सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) | निवडणूक विभाग, मुख्य इमारती शेजारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ७ |
| २ | उमेदवारी अर्जाच्या छाननीचा दिनांक, वार व वेळ | मंगळवार, दि. ३१ जुलै, २०१८ (वेळ : सकाळी ११.०० वाजता) | निवडणूक विभाग, मुख्य इमारती शेजारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ७ |
| ३ | उमेदवारी अर्ज मागे घेण्यासंबंधी लेखी कळविण्याचा वार, दिनांक व वेळ (सन २०१७ चा एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. १० (५) नुसार) | शुक्रवार, दि. ०३ ऑगस्ट, २०१८ (वेळ : सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) | निवडणूक विभाग, मुख्य इमारती शेजारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ७ |
| ४ | निवडणूक वार, दिनांक, वेळ व स्थळ (सन २०१७ चा एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. ९ (२) नुसार) | **शुक्रवार, दि. १० ऑगस्ट, २०१८ (परिशिष्ट-२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे)** | छत्रपती शिवाजी महाराज सभागृह, मुख्य इमारत, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ७ |
| ५ | मतपत्रिकांची छाननी व मतमोजणीचा वार, दिनांक, वेळ व स्थळ | **शुक्रवार, दि. १० ऑगस्ट, २०१८** (मतदानाची वेळ संपल्यानंतर लगेचच) | छत्रपती शिवाजी महाराज सभागृह, मुख्य इमारत, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ७ |

**(टिप : नमूद केलेल्या वेळेतच मतदान करता येईल.)**

२) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ४०(२)(घ)(एक) [40(2)(d)(i)] मधील तरतूद व महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार - ब, दिनांक २८ एप्रिल, २०१७ अन्वये विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाचा सदस्य म्हणून निवडून येण्याच्या, नामनिर्देशित करण्याच्या अथवा स्वीकृत करुन घेण्याच्या पात्रता शर्ती विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या आहेत. या पात्रता शर्तींच्या अनुसूची एक मधील तरतूदीनुसार नुसार प्रत्येक अभ्यास मंडळावर अध्यक्ष म्हणून निवडून येण्यासाठीच्या पात्रता शर्ती खालीलप्रमाणे आहेत :-

**i) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ४०(२)(घ)(एक) [40(2)(d)(i)] मधील तरतुदीनूसार प्रत्येक अभ्यास मंडळाचा सदस्य असलेल्यांमधून एका सदस्याची अभ्यास मंडळाच्या अध्यक्ष पदाची निवडणूक.**

४०(२)(घ)(एक): अभ्यास मंडळ त्याच्या पहिल्या बैठकीत :-

* कलम ६५ च्या तरतुदींना अधीन राहून, अभ्यास मंडळ त्याच्या सदस्यांमधून एका सदस्याची अध्यक्ष म्हणून निवड करील :

परंतु, अभ्यास मंडळाच्या अध्यक्ष म्हणून निवडून द्यावयाचा सदस्य हा, पदव्युत्तर विद्यार्थ्यांना अध्यापन करण्यासाठी मान्यता मिळालेला व पदव्युत्तर विद्यार्थ्यांना अध्यापन करणारा अध्यापक असेल; आणि त्यानंतर पुढील व्यक्तींना स्वीकृत करुन घेईल -

40(2)(d)(i) : the Board of Studies, at its first meeting, shall,-

* Subject to the provisions of section 65, elect one of the members as a chairperson of the board of the studies from amongst its members :

Provided that the member to be elected as a chairperson of Board of Studies shall be a post graduate recognized teacher imparting teaching to post graduate students; and thereafter co-opt -

**ii) निवडणुकीसाठीच्या पात्रता शर्ती खालीलप्रमाणे –**

**संबंधित अभ्यास मंडळाच्या सदस्यांमधून निवडलेला –**

क) उमेदवार हा पीएच.डी. पदवीधारक असावा,

ख) एकूण किमान पंधरा वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असावा,

ग) पदव्युत्तर विद्यार्थ्यांना अध्यापन करणारा मान्यताप्राप्त पदव्युत्तर अध्यापक असावा,

घ) मान्यताप्राप्त पीएच.डी. मार्गदर्शक असावा ज्याच्या पर्यवेक्षणाखाली किमान दोन विद्यार्थ्यांना पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आलेली असेल,

ङ) किमान दोन पाठयपुस्तकांचा/संदर्भ पुस्तकांचा लेखक/सहलेखक असावा किंवा मूळ लेखक / अनुरुप लेखक म्हणून तज्ज्ञ परीक्षित जर्नल्स मध्ये किमान तीन शोधनिबंध प्रसिध्द केलेले असावे,

च) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्षे केलेले असावे.

**नामनिर्देशन पत्रासोबत जोडावयाची कागदपत्रे (साक्षांकित प्रती)**

१. पीएच.डी. पदवी प्रमाणपत्र,
२. एकूण किमान पंधरा (१५) वर्षे अध्यापनाच्या अनुभवाचे विहित नमून्यातील प्रमाणपत्र. (परिपत्रक क्रमांक १८१/२०१७, दिनांक १८ ऑगस्ट, २०१७ च्या परिशिष्ट क्रमांक ५ किंवा ६ किंवा ७ प्रमाणे) आणि विद्यापीठ मान्यता पत्राची प्रत / प्रती,
३. पदव्युत्तर विद्यार्थ्यांना अध्यापन करण्याबाबतचे विद्यापीठाचे मान्यतापत्र,
४. पीएच.डी. मार्गदर्शक म्हणून विद्यापीठ मान्यता पत्राची प्रत / प्रती तसेच किमान दोन विद्यार्थ्यांना पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आलेली असेल अश्या विद्यार्थ्यांचे पीएच.डी. पदवी प्रमाणपत्र,
५. किमान दोन पाठयपुस्तकांचा/संदर्भ पुस्तकांचा लेखक/सहलेखक असल्याबाबत किंवा मूळ लेखक / अनुरुप लेखक म्हणून तज्ज्ञ परीक्षित जर्नल्स मध्ये किमान तीन शोधनिबंध प्रसिध्द केलेले असल्याबाबतची संबंधित कागदपत्र,
६. विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाजाचे एकूण किमान पाच वर्षे अनुभवाचे विहित नमून्यातील प्रमाणपत्र, (परिपत्रक क्रमांक १८१/२०१७, दिनांक १८ ऑगस्ट, २०१७ च्या परिशिष्ट क्रमांक १ किंवा २ किंवा ३ प्रमाणे)
७. नावात बदल असल्यास शासन राजपत्र किंवा विवाह नोंदणी प्रमाणपत्र.

३) **उमेदवारी अर्ज /उमेदवारी मागे घेण्याचे अर्ज भरण्यासंबंधीच्या सूचना :**

उमेदवारी अर्ज व उमेदवारी मागे घेण्याचे अर्ज विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या संकेतस्थळावरील Downloads -> Download Nomination Form या लिंकवर उपलब्ध असून सदर अर्ज डाऊनलोड करुन घेता येईल.

उमेदवारी अर्ज सादर करण्याच्या विहित वेळेपूर्वी विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या संकेतस्थळावरील Nominations -> Pay Nomination fees या लिंकमार्फत उमेदवारी अर्जाचे शुल्क नापरतावा (Non - refundable) रु. १०००/- (रुपये एक हजार फक्त) व उमेदवारी मागे घेण्याचा अर्ज सादर करण्याच्या विहित वेळेपूर्वी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचे नापरतावा (Non - refundable) शुल्क रु. २००/- (रुपये दोनशे फक्त) ऑनलाईन पध्दतीने भरता येईल किंवा सदर संबंधित अर्जाचे शुल्क "बँक ऑफ महाराष्ट्र" / "एच.डी.एफ.सी. बँक" या बँकेत चलनाद्वारे भरता येईल. अर्जासोबत संबंधित आवश्यक कागदपत्रे (स्वयं-साक्षांकित) व चलनाद्वारे अथवा ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या शुल्काची पावती जोडून असे अर्ज निवडणूक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे विहित वेळेत जमा करावेत.

**टिप : ऐनवेळेला ऑनलाईन शुल्क भरताना तांत्रिक समस्या उद्भवल्यास किंवा चलनाद्वारे शुल्क भरताना बँकेच्या कामकाजाचे दिवस व वेळ पाळली न गेल्यास व त्यामुळे उमेदवाराला विहित वेळेत उमेदवारी अर्ज / उमेदवारी मागे घेण्याचा अर्ज भरता न आल्यास त्याला विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.**

४) योग्यरितीने भरलेले आणि विहित वेळेपूर्वी सर्व कागदपत्रांसह दाखल केलेले, उमेदवारी अर्जच विचारात घेतले जातील.

५) नामनिर्देशनपत्रांवर, मत देण्यासाठी हक्कदार असलेल्या दोन मतदारांकडून दिनांक लिहून स्वाक्षरी करण्यात येईल आणि त्यामध्ये, दिनांक, नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची पूर्ण नावे, पत्ते व पदनामे, कोणतीही असल्यास, आणि स्वाक्षरीकर्त्या मतदारांचा व नामनिर्देशित उमेदवारांचा मतदार क्रमांक यांचा समावेश असेल. कोणत्याही व्यक्तीला, त्याने नामनिर्देशन पत्रावर स्वाक्षरी करुन व दिनांक लिहून त्याची संमती दिल्याखेरीज निवडणुकीतील उमेदवार म्हणून नामनिर्देशित केले जाणार नाही. कोणतीही व्यक्ती, त्याच्या स्वतःच्या नामनिर्देशनामध्ये एकतर सूचक किंवा अनुमोदक असणार नाही.

परंतु, जेथे तीनपेक्षा कमी मतदार असतील तेथे उमेदवार, त्याच्या नामनिर्देशनामध्ये स्वतः सूचक व अनुमोदक असू शकेल. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. १० (३))

६) या निवडणूक सूचनेमध्ये नमूद केलेल्या सर्व अटींचे अनुपालन करीत नसलेले नामनिर्देशनपत्र अवैध असेल आणि ते फेटाळले जाईल. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. १० (४))

७) उमेदवारास निवडणुकीतून माघार घेण्याचा पर्याय खुला असेल : परंतु, अशा उमेदवारास निवडणुकीच्या वेळापत्रकात विहित केलेल्या दिनांकास सायंकाळी ५ वाजण्यापूर्वी विद्यापीठाच्या कार्यालयात व्यक्तिशः किंवा त्याने लिखित स्वरुपात प्राधिकृत केलेल्या व्यक्तीमार्फत त्याने स्वाक्षरीत केलेला नामनिर्देशन मागे घेतल्याचा अर्ज सादर करावा लागेल. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. १० (५))

८) नामनिर्देशन पत्राच्या वैधतेच्या संदर्भात कोणताही वाद किंवा शंका असल्यास, कुलगुरुंकडे अपिल करता येईल आणि मा. कुलगुरुंचा निर्णय अंतिम असेल. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. १० (७))

९) उमेदवारी मागे घेण्याच्या मुदतीनंतर निवडून द्यावयाच्या जागांपेक्षा अधिक उमेदवार नसतील तर ते सर्व उमेदवार, निवडणुकीचा निकाल जाहिर करण्याच्या दिनांकास बिनविरोध निवडून आल्याचे जाहिर करण्यात येईल. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. १० (८))

१०) उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या मुदतीनंतर निवडून द्यावयाच्या जागांपेक्षा जास्त उमेदवार असतील तर अशा उमेदवारांची अंतिम यादी विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

११) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार - ब, दिनांक २८ एप्रिल, २०१७ व त्या संदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके/पत्रे यांच्या अन्वये विद्यापीठाच्या कोणत्याही अधिकार मंडळावर निवडून येण्यासाठी/नामनिर्देशित होण्यासाठी शासनाने विहित केलेल्या पात्रता शर्ती पूर्ण करणाऱ्या उमेदवारांचेच नामनिर्देशन अर्ज ग्राह्य धरण्यात येतील. शासन राजपत्र, शासनाने यासंबंधी वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके / पत्रे तसेच पात्रता शर्तीच्या ग्राह्यतेसंबंधीच्या नियमांबाबतच्या विद्यापीठाचे परिपत्रक क्र. १८१/२०१७, दि. १८ ऑगस्ट, २०१७ यांची प्रत विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या संकेतस्थळावर Act/Statutes व Notifications/Circulars या लिंकवर उपलब्ध आहे.

१२) उमेदवारी अर्जासोबत वर नमूद केल्याप्रमाणे आवश्यक त्या कागदपत्रांच्या स्वयं-साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. अन्यथा संबंधित नामनिर्देशनपत्र 'अवैध' ठरविण्यात येईल (मतदार नोंदणीच्या वेळी जोडलेली कागदपत्रे उमेदवारी अर्जाकरिता ग्राह्य धरली जाणार नाहीत).

१३) उमेदवारी अर्ज छाननीच्यावेळी स्वतः उमेदवार किंवा त्याने लेखी पत्राव्दारे प्राधिकृत केलेला त्याच मतदार यादीतील मतदार असलेली व्यक्ती प्रतिनिधी म्हणून एक तास अगोदर पूर्वसूचना देऊन ओळखपत्र दाखवून हजर राहू शकेल. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. १० (६))

१४) **शुक्रवार, दिनांक , १० ऑगस्ट, २०१८ रोजी छत्रपती शिवाजी महाराज सभागृह, मुख्य इमारत, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे ४११००७ येथे होणा-या अभ्यास मंडळाच्या बैठकीत संबंधित मतदारांनी मतदान करावयाचे आहे.**

१५) **मतदान करण्यास पात्र असलेल्या प्रत्येक अभ्यास मंडळ सदस्यांची यादी सोबत जोडल्याप्रमाणे प्रसिध्द करण्यात येत आहे. तथापि, रिक्त असलेल्या अभ्यास मंडळ सदस्यांमध्ये नवीन सदस्यांचा (नामनिर्देशित सदस्य) समावेश झाल्यास सदर यादी मतदानापूर्वी अद्ययावत करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.**

१६) मतदानास येताना मतदारांनी स्वतःचा फोटो असलेले ओळखपत्र उदा. शासकीय / निमशासकीय सेवकांचे कार्यालयीन ओळखपत्र, आधारकार्ड, पारपत्र, वाहन चालविण्याचा परवाना (ड्रायव्हींग लायसेन्स) किंवा सर्वसाधारण निवडणुकीसाठी सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेले फोटोसहित ओळखपत्र किंवा आयकर अधिका-यांनी (Income Tax) दिलेले फोटोसहित ओळखपत्र (PAN Card) किंवा तत्सम फोटोसहित ओळखपत्र आणणे आवश्यक आहे. **संबंधित सभासदास / मतदारास ओळखपत्र दाखविल्याशिवाय मतपत्रिका मिळणार नाही.**

१७) ही निवडणूक प्रमाणशीर प्रतिनिधित्व पध्दतीनुसार एकक संक्रमणीय मतानुसार परिनियमांव्दारे विहित केल्याप्रमाणे घेण्यात येईल. या निवडणुकीसाठी मतदान हे पसंतीनुसार प्राधान्यक्रम या पध्दतीने करावयाचे आहे. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. ५ व ६)

१८) * सन २०१७ – २०१८ च्या निवडणुकीसाठी लागू नाही.

मा. कुलगुरु यांच्या आदेशावरुन

गंणेशखिंड, पुणे ४११००७ )
संदर्भ क्र. साफुपुविनि/४०(२)(घ)(एक)/ ७८७ )
दिनांक : **२० जुलै, २०१८** )

AS 20/7/18

( डॉ. अरविंद दिगंबर शाळिग्राम )
**प्रभारी कुलसचिव**

प्रत : **सर्व संबंधित मतदार.**

निवडणूक सूचना जा. क्र. - साफुपुविनि / ४०(२)(घ)(एक) /७८७, दिनांक २० जुलै, २०१८ चे परिशिष्ट – १

# LIST OF BOARD OF STUDIES

| (D) FACULTY - INTER-DISCIPLINARY STUDIES | |
|---|---|
| 1. | Education |
| 2. | Administration and Evaluation |
| 3. | Education Psychology |

20/7/18

Dr. Arvind D. Shaligram
Officiating Registrar

निवडणूक सूचना जा. क्र. - साफुपुविनि / ४०(२)(घ)(एक) /७८७ , दिनांक २० जुलै, २०१८ चे परिशिष्ट – २

# Meeting Schedule of Board of Studies

## FACULTY - INTER-DISCIPLINARY STUDIES

### Date : 10/08/2018

| Sr. No. | Name of BOS | Day & Date | Meeting Time | Election Time | Counting |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Education | Friday, 10/08/2018 | 11.00 a.m. | 11.15 a.m. to 11.30 a.m. | After Election |
| 2 | Administration and Evaluation | | | | |
| 3 | Education Psychology | | | | |

20/7/18

Dr. Arvind D. Shaligram
Officiating Registrar

# Savitribai Phule Pune University

## List of Board of Studies Members
## (As per Maharashtra Public Universities Act, 2016)

**Name of the Faculty : Inter-disciplinary Studies**
**Board of Studies : Education**

| Sr. No. | No. | Section | Designation / Name and Address |
|---|---|---|---|
| 1 | 1 | 40 (2)(a) | **Sonawane Sanjeev,** Department of Education & Extension, Savitribai Phule Pune University, Pune - 411007. |
| 2 | 2 | 40 (2)(b) (i) | **Sonawane Sanjeev,** Department of Education & Extension, Savitribai Phule Pune University, Pune - 411007. |
| 3 | 3 | 40 (2)(b) (ii) | **Deokar Sanjay Baban,** Rajgad Dnyanpith Sou. Nirmalatai Thopate College of Education, Bhor, Dist. Pune-412206. |
| 4 | 4 | | **Vacant** |
| 5 | 5 | 40 (2)(b) (iii) | **Herkal Surendra Chandrakant,** MAEER'S Saint Dnyaneshwar College of Education, Dehu Phata, Alandi, Pune-412105. |
| 6 | 6 | | **Joshi Prasad Narsinha,** Adarsha Shikshan Mandali's Adarsha Comprehensive College of Education and Research, Erandawane, Karve Road, Pune-411004. |
| 7 | 7 | | **Chobhe Ravindra Maruti,** Vidya Pratishthan Sanchalit College of Education, 105, Kedgaondevi Road, Ahmednagar-414005. |
| 8 | 8 | 40 (2)(c) | **Isave Madhuri Suresh** Shikshan Prasarak Mandal's Tilak College of Education, S. P. College Area, Sadashiv Peth, Pune-411030. |
| 9 | 9 | | **Kamble Mohan Sakharam** Adarsha Shikshan Mandali's Adarsha Comprehensive College of Education and Research, Erandawane, Karve Road, Pune-411004. |
| 10 | 10 | | **Pondhe Mukund Sahebrao** Rayat Shikshan Sanstha's Swami Sahajanand Bharati College of Education, Tal. Shrirampur, Dist. Ahmednagar. |

20/7/18

**Dr. Arvind D. Shaligram**
**Officiating Registrar**

# Savitribai Phule Pune University

## List of Board of Studies Members
## (As per Maharashtra Public Universities Act, 2016)

**Name of the Faculty : Inter-disciplinary Studies**
**Board of Studies : Administration and Evaluation**

| Sr. No. | No. | Section | Designation / Name and Address |
|---|---|---|---|
| 1 | 1 | 40 (2)(a) | **Sonawane Sanjeev,** Department of Education & Extension, Savitribai Phule Pune University, Pune - 411007. |
| 2 | 2 | 40 (2)(b) (i) | **Uplane Megha,** Department of Education & Extension, Savitribai Phule Pune University, Pune - 411007. |
| 3 | 3 | 40 (2)(b) (ii) | **Shingate Chandan Amar,** Shikshan Prasarak Mandal's Tilak College of Education, S. P. College Area, Sadashiv Peth, Pune-411030. |
| 4 | 4 | | **Vacant** |
| 5 | 5 | 40 (2)(b) (iii) | **Jaybhaye Rajeshree Gahininath,** Adarsha Shikshan Mandali's Adarsha Comprehensive College of Education and Research, Erandawane, Karve Road, Pune-411004. |
| 6 | 6 | | **Chaudhari Kanchan Rajesh,** Abhinav Education Society's College of Education, Ambegaon, Pune-411046. |
| 7 | 7 | | **Desai Shivaji Balaku,** Sinhgad Technical Education Society's Smt. Kashibai Navale College of Education & Training, Kusgaon Bk., Lonavala, Dist. Pune-410401. |
| 8 | 8 | | **Dhamane Vijay Fakira** Shikshan Prasarak Mandal's Tilak College of Education, S. P. College Area, Sadashiv Peth, Pune-411030. |
| 9 | 9 | 40 (2)(c) | **Vacant** |
| 10 | 10 | | **Vacant** |

2017/18

**Dr. Arvind D. Shaligram**
**Officiating Registrar**

# Savitribai Phule Pune University

## List of Board of Studies Members
## (As per Maharashtra Public Universities Act, 2016)

**Name of the Faculty : Inter-disciplinary Studies**
**Board of Studies : Education Psychology**

| Sr. No. | No. | Section | Designation / Name and Address |
|---|---|---|---|
| 1 | 1 | 40 (2)(a) | **Sonawane Sanjeev,**<br>Department of Education & Extension,<br>Savitribai Phule Pune University, Pune - 411007. |
| 2 | 2 | 40 (2)(b) (i) | **Jadhav Vaibhav,**<br>Department of Education & Extension,<br>Savitribai Phule Pune University, Pune - 411007. |
| 3 | 3 | 40 (2)(b) (ii) | **Choudhari Manisha Shriram,**<br>Maratha Vidya Prasarak Samaj's College of Education,<br>MVP Campus, Gangapur Road, Nashik-422002. |
| 4 | 4 | | **Vacant** |
| 5 | 5 | 40 (2)(b) (iii) | **Vacant** |
| 6 | 6 | | **Tidke Sangeeta Anant,**<br>Maratha Vidya Prasarak Samaj's College of Education,<br>MVP Campus, Gangapur Road, Nashik-422002. |
| 7 | 7 | | **Waje Vidya Pandurang,**<br>Pravara Gramin Shikshan Sanstha's<br>Pravara Rural College of Education,<br>P.O. Loni, Tal. Rahata, Dist. Ahmednagar-413713 |
| 8 | 8 | 40 (2)(c) | **Ansari Mohammad Farooque Abdul Qadir**<br>Jadeed Anjuman E Taleem Haroon Ansari Girls College of Education, Sr. No. 10, Islampura, Malegaon, Dist. Nashik. |
| 9 | 9 | | **Borase Chandrakant Mhasu**<br>Maratha Vidya Prasarak Samaj's College of Education,<br>MVP Campus, Gangapur Road, Nashik-422002. |
| 10 | 10 | | **Chavan Dipak Kedusheth**<br>Shikshan Prasarak Mandal's Tilak College of Education,<br>S. P. College Area, Sadashiv Peth, Pune-411030. |

**Dr. Arvind D. Shaligram**
**Officiating Registrar**